
R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५६ वे, अंक ११वा, मुंबई । जानेवारी २०२४
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 56, Issue : 11, Mumbai I January 2024
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50

जय श्रीराम | जय श्रीराम | जय श्रीराम | जय श्रीराम | जय श्रीराम | जय श्रीराम | जय श्रीराम | जय श्रीराम | जय श्रीराम |



## ।। विजयी पताका श्रीरामाची, झळकते अंबरी, प्रभु आले मंदिरी ।।




देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

**समाचार**

वर्ष ५६वे, अंक ११वा,
जानेवारी २०२४
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष



**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९


**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**


दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in


# दिवाळी स्नेहसंमेलन - २०२३











IndusInd Bank
FE INDIA'S BEST BANKS AWARDS
IndusInd Bank has been adjudged the winner in the category of 'Best Savings Product' at the FE Best Banks Awards 2020-21.
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE!
%
Attractive Interest Rates
on Savings Account and Fixed Deposits
VIDEO Branch
Face-to-face banking anytime, anywhere
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
GET UP TO 20% OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
TICKET
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow
And much more...
Visit your nearest IndusInd Bank branch or
Call 1860 267 7777 | 022 4406 6666 | www.indusind.com
/OfficialIndusIndBankPage/
/indusind_bank/
/MyIndusIndBank
YouTube /user/IndusIndBank
*T&C Apply. Opening of account with IndusInd Bank is subject to ensuring Know Your Customer documentation and verification.
Kindly read terms and conditions of individual offers furnished at www.indusind.com or visit nearest branch of IndusInd Bank to know further details.


HD FIRE PROTECT
Protecting what matters most to you
World-Class Fire Fighting Products
and Suppression Systems
Serving
75+
Countries
Worldwide
30+
YEARS
OF MANUFACTURING EXCELLENCE
HD FIRE PROTECT PVT. LTD.
Corporate Headquarters: D-6/2, Road No. 34, Wagle Estate, Thane 400604, India
Tel: +(91) 22 21582600 | Fax: +(91) 22 21582602 | Email: info@hdfire.com
VdS
www.hdfire.com | @HdFireProtectPvtLtd | @hd-fire-protect | @TheHdfire

# मनोगत

सभासद बंधु भगिनींनो आपल्या सर्वांना तसेच कुटुंबियांना व मित्रमैत्रीणींना २०२४ हे वर्ष आनंदाचे, सुखसमृद्धीचे व निरोगी आनंदायी जावो!

मागील सर्वसाधारण सभेमध्ये मंडळाच्या बहुसंख्य सभासदांनी व्यक्त केलेल्या मतांचा आदर करून मंडळाच्या नविन कार्यकारिणीची लवकरात लवकर निवड व्हावी यादृष्टीने कार्याध्यक्षांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले होते. याचा पाठपुरावा म्हणून दि. १८ फेब्रुवारी २०२४ रोजी सर्व संलग्न संस्थांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची उदा. अध्यक्ष, कार्याध्यक्ष व सचिव यांची संयुक्त सभा सोलापूर येथे घेण्याचे ठरले असून सोलापूर संस्थेने त्यास मान्यता दिली आहे.

या सभेमध्ये आपण सर्वजण उपस्थित राहून खेळीमेळीच्या वातावरणात नवीन कार्यकारिणीच्या निवडीसंबंधी धोरण ठरवूया.

मध्यवर्ती मंडळाचे पदाधिकारी त्यांच्या कार्याचा अहवाल प्रतिवर्षी सर्वसाधारण सभेमध्ये सादर करतात आणि आपल्या सगळ्यांकडून त्याला मंजूरी मिळाली आहे व कौतुकही झाले आहे. परंतु संलग्न संस्थांच्या कार्याचा अहवाल आपण गेल्या ३ वर्षात त्यांचेकडून प्राप्त न झाल्यामुळे आपण या सभेमध्ये यासंबंधी सर्व उपस्थितांच्या संम्मतीने चर्चा करुया आणि संलग्न संस्था एकमेकांच्या हातात हात घालून त्यांच्या कार्यामध्ये कशी वृद्धी करतील व सर्वसामान्य सभासदांना कसा आपल्याला अधिक लाभ देता येईल यादृष्टीने विचार करुया. मध्यवर्ती मंडळाच्या सभासद वृद्धीमध्ये यावर विचार करून काही नवीन योजना आखता येतील का यासंबंधी विचारांचे आदान-प्रदान करुया. मध्यवर्ती मंडळाची सध्याची सभासद संख्या सुमारे ८००० आहे व ती २०२४ च्या अखेरीस १०००० पर्यंत पोहोचावी अशी आमची अपेक्षा आहे. त्यादृष्टीने आपण सर्वजण सोलापूर येथे भेटूया. या सभेस सर्व संलग्न संस्था पदाधिकाऱ्यांनी निश्चितपणे हजर राहून ही सभा यशस्वी करण्यासाठी मदत करावी, ही विनंती.

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह

# संलग्न संस्था वृत्त

**डोंबिवली :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवली यांचे ५४ वे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक १० डिसेंबर २०२३ रोजी संपन्न झाले. हेरिटेज् या विशाल सभागृहात झालेल्या सोहळ्यात सुमारे ३५० ते ४००सभासद बंधू भगिनी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन या ५४व्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन झाले.

मनोरंजनाच्या कार्यक्रमात कन्नड गीताबद्दल आंतरराष्ट्रीय पारितोषिक मिळालेल्या सुप्रसिद्ध गायिका मुग्धा हसबनीस यांच्या सुमधुर मराठी गीतांनी रसिकांच्या अंतःकरणाचा ठाव घेतला. संमेलनाध्यक्ष श्री मुकुंदराव कुलकर्णी, प्रमुख अतिथी डॉक्टर जितेंद्र जोशी, विशेष अतिथी, मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष श्री विलासराव जोशी व कार्याध्यक्ष श्री प्रभाकर कुलकर्णी, संस्थेचे विश्वस्त अध्यक्ष श्री अविनाश कुलकर्णी, अध्यक्ष श्री जगन्नाथ जोशी, उपाध्यक्ष श्री महाशब्दे आणि कार्यवाह श्री नरेश कुलकर्णी यांच्या व्यासपीठावरील आगमनाने! संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व शाल आणि चांदीचे नाणे देऊन सत्कार केला. अध्यक्ष श्री जगन्नाथ जोशी यांनी, संस्थेच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेऊन झालेल्या प्रगतीबद्दल

सर्व सभासद बांधवांबद्दल तसेच वेळोवेळी मोलाचे अर्थसाह्य केल्याबद्दल सर्व प्रायोजक, जाहिरातदार देणगीदारांचेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तसेच महिला समिती, युवा समिती आणि बाकी सर्व समित्यांनी वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. युवा नेता मानस पिंगळे याने युवा समिती करत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली, तसेच संस्थेचे स्वतःचे ऋग्वेद भवन व्हावे अशी इच्छा व्यक्त करुन त्यासाठी सर्व युवा सभासदातर्फे प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. सन्माननीय अतिथी श्री विलासराव जोशी यांनी संस्थेच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले तर श्री प्रभाकर कुलकर्णी यांनी संस्थेच्या कामाची व उत्तम नेतृत्वाची प्रशंसा केली. बिझिनेस Tycoon म्हणून ओळखले जाणारे अभि ग्रुपचे सर्वेसर्वा असलेले प्रमुख पाहुणे डा. जितेंद्र जोशी यांनी स्वतःचे व्यावसायिक अनुभव सांगून ब्राह्मण तरूणांना, ज्येष्ठांच्या अनुभवाचा आदर करा.

मानसिकता बदलून, स्वतःचा उद्योग सुरु करा आणि कठोर कष्टाने भारताचे उज्वल भविष्य घडवा असा बहुमोल सल्ला दिला. उद्योग साम्राज्याच्या वाटचालीची त्यांची यशोगाथा प्रेक्षकांना प्रचंड उर्जा देऊन गेली व कौतुकमिश्रित टाळ्यांनी सभागृह दुमदुमले. दे ऋ ब्रा संघ डोंबिवली संस्थेने ५४ व्या स्नेहसंमेलनानिमित्त काढलेल्या ऋग्वेद स्मरणिकेचे संमेलनाध्यक्ष श्री मुकुंदराव कुलकर्णी व प्रमुख पाहुणे डा जितेंद्र जोशी यांच्या हस्ते प्रकाशन झाले. समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या गुणवंत सभासदांचा सत्कार झाला

श्री संजय कुलकर्णी (शिक्षण क्षेत्र), अडव्होकेट सौ माधुरी जोशी (कायदा समाजसेवा आदिवासी आणि वन्य जमातींची सेवा), श्री निलेश भणगे- (प्राणी मित्र/रक्षक), श्री अरविंद कोऱ्हाळकर (व्यवसाय व उद्योग क्षेत्र), श्री योगेश वाळुंजकर (सायबर सिक्युरिटी तज्ज्ञ), श्री अनंत कुलकर्णी बँकिंग (सहकार क्षेत्र ), सौ प्रतिभा ताराबादकर (साहित्य क्षेत्र), श्री सी एम पुरोहित (गुंतवणूक तज्ज्ञ)

या आठ मान्यवर व्यक्तिंचा ,संमेलनाध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ, चांदीचे नाणे देऊन सत्कार करण्यात आला. या स्नेहसंमेलनासाठी मुंबई, विलेपार्ले, मुलुंड, कल्याण येथून आलेल्या संलग्न संस्थांतील प्रतिनिधींचा, ब्राह्मण महासंघ डोंबिवलीच्या पदाधिकाऱ्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तद्नंतर संस्थेच्या, वयाची नव्वदी गाठलेल्या अतिशय उत्साही अशा अति- ज्येष्ठ सभासदांच्या मंगल सत्कारानंतर संमेलनाचे दुसरे सत्र संपले. संस्थेच्या परंपरेप्रमाणे दरवर्षी संलग्न शाखातून उत्तम काम करणाऱ्या सभासदांना पुरस्कार दिला जातो १) श्री मिहिर घोटीकर - राष्ट्रीय कामगिरीतील उल्लेखनीय सहभाग (चांद्रयान ३ साठी महत्वाच्या भागांची निर्मिती व पुरवठा) २) श्री सुधीर ढोबळे -उत्कृष्ट कार्यकर्ता -डोंबिवली शाखा ३) सौ.केतकी कुलकर्णी -उत्कृष्ट कार्यकर्ती संलग्न संस्था महाराष्ट्र यावर्षीपासून सुरु केलेला नवीन पुरस्कार ४) श्री माधव घुले चित्पावन संघ- उत्कृष्ट कार्यकर्ता संलग्न संस्था डोंबिवली. या सर्वांना शाल पुष्पगुच्छ चांदीचे नाणे देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावर्षीचा जीवन गौरव पुरस्कार संस्थेचे माजी अध्यक्ष आणि मुलुंड शाखेचे विद्यमान विश्वस्त श्री रामचंद्र परशुराम दिगवडेकर यांना पुष्पगुच्छ, शाल, चांदीचे नाणे आणि मानपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.या मानपत्राचे लेखन सौ शुभदा कुलकर्णी यांनी केले होते. सत्काराला उत्तर देताना. श्री दिगवडेकर यांनी हा आपल्या जीवनातील कृतार्थतेचा क्षणअसून असे सांगून त्याबद्दल संस्थेला धन्यवाद दिले.

यानंतर संमेलनाध्यक्ष ,प्रसिद्ध उद्योजक,नाशिकचे श्री मुकुंदराव कुलकर्णी यांनी त्यांच्या अतिशय उद्बोधक व्याख्यानात त्यांच्या व्यवसायातील यशाचे मर्म सांगून मोलाचा संदेश दिला की, सर्व ब्राह्मणांनी एकत्र येऊन काम करण्याची नितांत आवश्यकता आहे. ब्राह्मणांना जन्मजात बुद्धीचे वरदान आहे. त्यांनी आपल्या अंगच्या बुद्धीला व कर्तृत्वाला जाणून, पारंपारिक विचार बदलावेत, चाकोरी सोडून उद्योजक व्हावे आणि आपल्या

उद्योगातून, व्यवसायातून समाजाची व देशाची सेवा करावी. त्यांच्या या तेजस्वी विचारांना प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात श्रोत्यांची दाद मिळाली. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ शुभदा कुलकर्णी आणि अनुराधा मोहिदेकर यांनी केले. आभार प्रदर्शन व त्यानंतरच्या सुग्रास भोजनाने ह्या चैतन्य सोहळ्याची सांगता झाली.

**बेळगाव : समर्थ सोसायटीच्या संचालकांची फेरनिवड –** प्रगतीपर वाटचाल करीत असलेल्या येथील समर्थ अर्बन को-ऑप. सोसायटीच्या २०२४-२८ या पाच वर्षासाठी संचालक मंडळाची बिनविरोध निवड झाली. चेअरमनपदी ॲड्. अजय सुनाळकर यांची तर व्हाईस चेअरमनपदी अभय जोशी यांची फेरनिवड करण्यात आली. गुरुवारी दुपारी झालेल्या बैठकप्रसंगी सहकारी सोसायटी खात्याचे सुररिटेंडेंट संतोष हेगडे यांनी रिटर्निंग ऑफिसर म्हणून काम पाहिले. संस्थेचे संचालक पुढीलप्रमाणे आहेत.

मालतेश जी. पाटील, विनायक जी. जोशी, अरविंद एस. कुलकर्णी, गणपत ए. कुलकर्णी, प्रदीपकुमार जी. कुलकर्णी, अनिल व्ही. भंडारी, उमेश डी. सुनगार, सुनंदा सी. आळतेकर, छाया एन. जोशी, परशुराम एम. कांबळे व अशोक एच. पुजेरी यावेळी सेक्रेटरी राघवेंद्र केसनूर हेही उपस्थित होते. फेरनिवडीबद्दल चेअरमन व व्हाईस चेअरमन यांनी कृतज्ञता व्यक्त करून सोसायटीची अधिकाधिक प्रगती करू, असे विचार व्यक्त केले.

**मुंबई : श्री रामरक्षा स्तोत्रपठण सप्ताह –** श्री क्षेत्र अयोध्या येथील श्री राम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आणि भव्य मंदीराचे उद्घाटन सोहळ्याचे औचित्य साधून अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ 'श्री राम रक्षा स्तोत्र पठण सप्ताह आयोजित करीत आहे. आपणास सर्वांना जाहीर आमंत्रण आहे. हा कार्यक्रम दि. १५ जानेवारी २०२४ पासून २२ जानेवारी २०२४ पर्यंत दररोज संध्याकाळी ६.०० ते ७.३० पर्यंत सलग अकरा वेळा रामरक्षा




Protect Capital & Create Wealth.....

JAYANT DESHMUKH

B.COM. CAIIB DBM

Insurance & Investment Consultant

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

STAR Health Insurance Personal & Caring The Health Insurance Specialist

Get Insured... & Be Secured....

स्तोत्राचे सामूदायिक पठण होईल. स्थळ - लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास रोड, दादर, मुंबई ४०००१६. या सामूदायिक मंगलमय श्री राम उत्सवात बहुसंख्येने सहभागी व्हावे हे आग्रहाचे निमंत्रण. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी कृपया आपली उपस्थिती श्री. विकास माने मो. ९८९२४६२९६६, मिलिंद सरदेशमुख ९८६७९९४३८९, श्री. शिरीष झरेगावकर मो. ९८२०१३८००९० यांच्याशी संपर्क साधावा.

## कलम ३७० - ऐतिहासिक सत्याचा मागोवा

**संजय कुलकर्णी (निवृत्त लेफ्टनंट जनरल)** (मो. : ९६५०७७७८२७)

कलम ३७० हे फुटीरतेला प्रोत्साहन देणारे होते. काश्मीरमधील बंडखोरीचे मूळ कारण होते. काश्मीर हा नेहमीच संघर्षाचा केंद्रबिंदू राहिला होता. कलम ३७० कलम रद्द केल्याने होऊ शकणारा संघर्ष काश्मीरकेंद्रित असला तरी त्याचे परिणाम काश्मीर खोऱ्याच्या बाहेरही जाणवणार आहेत.

काश्मीरचे नेते शेख मोहम्मद अब्दुल्ला हे १९२४ आणि १९२७ मध्ये ब्रिटिशांच्या सल्ल्यानुसार महाराजा हरिसिंग यांनी लागू केलेल्या मर्यादित घटनात्मक सुधारणांचे लाभार्थी होते. अलीगढमध्ये उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांपैकी ते एक होते. १९०६ मध्ये स्थापन झालेल्या मुस्लिम लीगमध्ये मुहम्मद अली जीना १९१३ मध्ये सामील झाले. १९३२ मध्ये लाहोर आणि अलीगढमधून हे सुशिक्षित तरुण परतल्यानंतर जम्मू आणि काश्मीर मुस्लिम कॉन्फरन्सची स्थापना करण्यात आली आणि शेख अब्दुला हे ६ फूट ४ इंच उंचीचे व्यक्तिमत्त्व त्याचे पहिले अध्यक्ष म्हणून निवडले गेले. भारतीय राष्ट्रीय क्राँग्रेसही महाराजांच्या विरोधात हळूहळू काश्मीरमध्ये आपले अस्तित्व शोधत होती. १९३८-३९ मध्ये पंडित नेहरुंच्या सल्ल्यानुसार मुस्लिम कॉन्फरन्सचे नाव यऑल जम्मू आणि काश्मीर नॅशनल कॉन्फरन्सल असे करण्यात आले आणि संघटनेचे सदस्यत्व कोणत्याही धर्माचा विचार न करता सर्वांसाठी खुले करण्यात आले. नॅशनल कॉन्फरन्सने मुस्लिम लीगमध्ये विलीन व्हावे, जेणेकरून संयुक्त आघाडी करता येईल, अशी इच्छा जीना यांनी १९४४ मध्ये जम्मू आणि काश्मीर भेटीदरम्यान व्यक्त केली. शेख अब्दुल्ला यांना जम्मू-काश्मीरमधील त्यांचा प्रभाव कायम ठेवायचा होता म्हणून त्यांनी जीना यांच्या सामिलीकरणाच्या प्रस्तावास नकार दिला. यामुळे नाराज जीनांनी अब्दुल्ला आणि त्यांचा पक्ष यगुंडांचे टोळकेल असून, त्यांच्या काश्मीर छोडो आंदोलनाला राज्यात अराजक माजवायचे आहे, असे म्हटले होते. १९४६ मध्ये शेख अब्दुल्ला यांनी सार्वमताची मागणी केली आणि महाराजांनी त्यांना अटक केली. नेहरुंनी त्यांचा बचाव करण्याचा निर्णय घेतला आणि ते जम्मू-काश्मीरला गेले; पण त्यांना अटक करण्यात आली. या घटनेमुळे महाराजा आणि नेहरु यांच्यात वितुष्ट निर्माण झाले आणि त्याचा शेख यांनी फायदा घेतला. शेख यांनी २६ सप्टेंबर १९४७ रोजी माफी मागितली आणि २९ सप्टेंबर रोजी त्यांची सुटका करण्यात आली.

नॅशनल कॉन्फरन्सपासून दूर गेलेल्या मिरवैज मौलवी युसूफ शाह यांच्या नेतृत्वाखालील गटाने मुस्लिम कॉन्फरन्सचे पुनरुज्जीवन केले आणि जीना यांन या गटाला यसडलेले अंडेल असे संबोधले असले, तरीही मुस्लिम लीगला खूश करण्यासाठी मीरवैज यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स यांच्याबद्दल शतुत्व असल्याचे दर्शविले आणि त्यांची मर्जी संपादन केली. सध्याचे मीरवैज मुहम्मद उमर फारुख हे त्यांचे वंशज आहेत. जून १९४७ मध्ये लॉर्ड माउंटबॅटन यांची जम्मू-काश्मीर भेट आणि त्यानंतर ऑगस्ट १९४७ महात्मा गांधींची भेट महाराजांना जम्मू-काश्मीर स्वतंत्र राखण्याच्या कल्पनेपासून परावृत्त करण्यात अयशस्वी ठरली. पाकिस्तानबरोबर झालेल्या यजैसे थेल करारावर स्वाक्षरी करण्यासाठी आणखी वेळ मागितला. तथापि

पाकिस्तानने शांत न राहता नऊ इन्फंट्री बटालियन आणि दोन माऊंटन बॅटऱ्यांचा समावेश असलेल्या काश्मीर सैन्यावर गिलगिटपासून मीरपूरपर्यंत हल्ला चढवला. पाकिस्तानच्या अधिकृत सैन्याच्या पाठिंब्यावर हल्लेखोरांनी केलेल्या आक्रमणाचा प्रतिकार करता न आल्याने २४ ऑक्टोबर रोजी महाराजांनी भारताकडे मदतीची मागणी केली; मात्र २६ ऑक्टोबर १९४७ रोजी महाराजांनी सामिलीकरणाच्या करारावर स्वाक्षरी केल्यानंतरच भारताने ही मदत देऊ केली. तोपर्यंत बारामुल्ला हल्लेखोरांच्या हाती पडले होते. महाराजांच्या राज्य सैन्य दलातील मुस्लिम गटाने त्यांच्याविरुद्ध बंड केले होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत भारतीय सैन्य २७ ऑक्टोबर १९४७ रोजी श्रीनगरमध्ये दाखल झाले. महाराजांनी स्वाक्षरी केलेल्या सामिलीकरणाचा करार हा इतर संस्थानांच्या करारांप्रमाणेच आहे. त्यात कुठेही विशेष तरतुदी नाहीत. जर १ शीख, १ कुमाऊ, ४ कुमाऊ आणि इतर बटालियन नसत्या तर श्रीनगर खोऱ्याचा पाडाव निश्चित होता कारण पाकिस्तानी राज्यकर्त्यांचे पाठबळ असलेले हल्लेखोर श्रीनगरपासून फक्त ५० किमी अंतरावर होते आणि श्रीनगरमध्ये ईद साजरी करण्यासाठी जीना यांचे स्वागत करण्यास सर्वजण उत्सुक होते. वेळ अगदी कमी होता आणि अनर्थ जवळ आाल होता. केवळ महाराजच सामिलीकरणाच्या करारावर स्वाक्षरी करु शकत होते आणि ते कोणत्याही विशेष अटीशिवाय भारतात सामील झाले.

आपल्या राजवटीला अंत नसावा, असा शेख अब्दुल्ला यांचा विचार होता. जम्मू आणि काश्मीर राज्य ही आपली जहागीर असावी, अशी त्यांची इच्छा होती. अत्यंत महत्त्वाकांक्षी असा हा माणूस होता. ते काश्मीर खोऱ्यात धर्मवादी असायचे, जम्मूमध्ये कम्युनिस्ट असायचे आणि दिल्लीत राष्ट्रवादी असायचे. अब्दुल्ला यांच्या डोक्यात सत्ता गेली होती, असे १९४६ मध्ये फ्रँक मोरेस यांनी लिहिले आहे. अब्दुल्ला यांच्या वागणुकीतील दुटप्पीपणा श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी स्पष्टपणे पाहिला आणि संसदेत नेहरुंना समर्पक प्रश्न विचारला की, शेख अब्दुल्ला हे भारतीय राज्यघटना मानत नाहीत का? इतर संस्थानांप्रमाणे जम्मू-काश्मीरचा उर्वरित भारताशी असलेला संबंध महाराजांनी मान्य केला नाही का? मुखर्जी यांनी इशारा दिला की, कलम ३७० मध्ये स्पष्टपणे संकटांची बीजे ढळढळीत दिसत आहेत. त्यांच्यासाठी दोन ध्वज, दोन पंतप्रधान आणि दोन संविधान अस्वीकार्य आहेत. नेहरुंनी अब्दुल्लांचे तुष्टीकरण केल्याने मुखर्जी हैराण झाले. दुसरीकडे, अब्दुल्ला सातत्याने फुशारक्या मारत राहिले आणि या वर्तणुकीमुळेच अखेरीस १९५३ मध्ये त्यांना १९६४ पर्यंत बडतर्फ करण्यात येऊन ताब्यातही घेण्यात आले. यामुळे पुढे बराच गुंता निर्माण झाला. शेख यांची हकालपट्टी आणि जनमत आघाडीच्या स्थापनेमुळे १९५३ पासून जम्मू-काश्मीरमध्ये फुटीरतावादी राजकारण सुरु झाले.

जेव्हा शेख अब्दुल्ला यांनी जम्मू आणि काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देण्याची मागणी



केली, तेव्हा क्राँग्रेसच्या अनेक वरिष्ठ नेत्यांनी आणि संविधान सभेच्या सदस्यांनी असा आग्रह धरला की, विलीनीकरणाच्या समान करारावर स्वाक्षरी करणाऱ्या इतर ५६२ संस्थानांच्या तुलनेत जम्मू आणि काश्मीरची बाजू घेणे चुकीचे आहे. काश्मीर भारतात विलीन झाले नसून सामील झाले आहे, अशी भूमिका डॉ. करण सिंग आणि ओमर अब्दुल्ला यांनी अर्धशतकानंतर मांडणे हा दुटप्पीपणा होता. राजीनामा देणारे आंबेडकर आणि सरदार पटेल यांच्यासह कोणाचेही मन वळवता न आल्याने पंडित नेहरुंनी शेख अब्दुल्ला यांच्यावर आंधळा विश्वास ठेवला आणि जनमत चाचणी झाल्यास निर्णय भारताच्या बाजूने होईल, अशी खात्री बाळगली. नेहरु परदेश दौऱ्यावर जात असताना शेख यांच्या आग्रहास्तव त्यांनी नेहरुंच्या मंत्रिमंडळातील बिनखात्याचे मंत्री गोपालस्वामी अय्यंगार यांना तडजोडीचा मसुदा तयार करण्याचे निर्देश दिले. त्यांनी जो मसुदा मांडला, त्यात सरदार पटेल यांनी कलम ३७० मध्ये मतात्पुरताय हा शब्द टाकला. ५ ऑगस्ट २०१९ रोजी हे कलम अखेर रद्द करण्यात आले आणि ११ डिसेंबर २०२३ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर अखेर ते प्रभावशून्य झाले. जे डॉ. करण सिंग २५ वर्षे सद्र-ए रियासत म्हणून कार्यरत होते, २५ वर्षे केंद्रिय कॅबिनेट मंत्री होते आणि काही वर्षे राजदूत म्हणून ज्यांनी काम पाहिले, ते कलम ३७० रद्द करु शकले नाहीत. किंबहुना, त्यांना ते नकोच होते. त्यांनाच आता सुदैवाने जम्मू आणि काश्मीरने प्रगती करावी असे वाटते, हे आश्चर्यकारक आहे. डॉ. फारुख अब्दुला यांना असे वाटते आहे की, त्यांचे राज्य नरकात जाऊ शकते आणि मेहबुबा मुफ्ती यांनी मागे हटण्यास नकार दिला आहे. त्यांची निराशा उघडपणे दिसते आहे.

कलम ३७० हे फुटीरतेला उघडपणे प्रोत्साहन देते आणि ते राज्यातील बंडखोरीचे मूळ कारण होते. त्यामुळे काही तज्ज्ञांनी असे मत मांडले की, जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करणे हे घटनादुरुस्तीच्या मार्गाने व्हायला हवे होते, राष्ट्रपतींच्या आदेशाने नाही. कायदेशीरदृष्ट्या तसे करणे शक्य होते. राष्ट्रपतींच्या १९५४ च्या प्रचलित आदेशाला झुगारुन आणि राज्याला दिलेल्या स्वायत्ततेच्या सर्व तरतुदी रद्द करून, तसे केले जाणे कलम ३७० (३) मध्येच निहित आहे. सर्वोच्च न्यायालयाने ११ डिसेंबर २०२३ रोजी एकमताने संविधानातील कलम ३७० रद्द करण्याच्या राष्ट्रपतींच्या अधिकारावर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे ऑगस्ट २०१९ मध्ये जम्मू-काश्मीर राज्याची दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये पुनर्रचना झाली आणि राज्याचे विशेष विशेषाधिकार नाकारण्यात आले. त्यासाठीचा तर्क असा होता की, जम्मू आणि काश्मीर राज्याचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण सुलभ करण्यासाठी कलम ३७० ही केवळ तात्पुरती तरतूद होती.

कलम ३७० रद्द केल्याने जम्मू आणि काश्मीर या केंद्रशासित प्रदेशाला काय मिळाले? सर्वप्रथम एखाद्या केंद्रशासित प्रदेशाची किंवा राज्याची निर्मिती होते, तेव्हा ते भारतातील इतर राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशांसारखे असते, दुसरे म्हणजे, जम्मू-काश्मीरच्या नागरिकांकडे भारताचे एकल नागरिकत्व असेल. तिसरे म्हणजे, केंद्रीय प्राधिकार लागू होतो आणि तो केवळ परराष्ट्र व्यवहार, संरक्षण, वित्त आणि दळणवळण यापुरता मर्यादित राहत नाही. केंद्र आता राज्याच्या स्थानिक प्रशासनासाठीदेखील जबाबदार आहे. चौथे, काश्मीरमध्ये केवळ भारतीय राष्ट्रध्वज फडकेल, दोन ध्वज असणार नाहीत, दोन संविधान असणार नाहीत, दोन पंतप्रधान असणार नाहीत. पाचवे, काश्मिरींना कायमस्वरुपी रहिवाशांसाठी राज्य विधानसभांनी परिभाषित केल्यानुसार कायमस्वरुपी निवास प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. सहावे, कोणताही भारतीय नागरिक जम्मू-काश्मीरमध्ये स्थायिक होऊ शकतो आणि मालमत्ता खरेदी करू शकतो. पूर्वी तेथील रहिवासी भारतात कुठेही स्यायिक होऊ शकत होते; परंतु तेथील रहिवासी नसणारे लोक त्या राज्यात कायमस्वरुपी स्थायिक होऊ शकत नव्हते किंवा मालमत्ता खरेदी करु शकत नव्हते. सातवे, जम्मू-काश्मीरच्या ज्या महिला तेथील रहिवासी नसलेल्या व्यक्तींशी विवाहबद्ध आहेत, त्यांना हा अधिकार नाकारण्यात आला होता. ३७० कलम रद्द करण्यापूर्वीच्या परिस्थितीच्या अगदी

उलट आता त्यांना मालमत्तेत वारसा हक्क मिळू शकतो. आठवे, नागरिकत्व फक्त भारतीय नागरिकांना दिले जाईल, पाकिस्तानी लोकांना नाही. पूर्वी तसे केले जाऊ शकत होते.

जम्मू आणि काश्मीर राज्यातील काही नेत्यांची आणि काही राष्ट्रीय राजकीय पक्षांची सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर दिसून आलेली निराशा आणि प्रतिकूल प्रतिक्रिया स्वाभाविक आहेत. पाकिस्तानकडूनही जम्मू आणि काश्मीरमधील संघर्षाच्या अनेक पैलूंकडे लक्ष वेधले गेले आहे. ही गुंतागुंत बाह्य कारणांमुळे तसेच परस्पर संवादामुळे आहे. ज्यांना विशेषाधिकारांपासून वंचित झाल्यासारखे वाटते; परंतु त्यांच्याकडे पुरेसे उपद्रव्यमूल्य आहे, त्यांनीच अंतर्गत कलहाला आजवर प्रोत्साहन दिले आहे. काश्मीर हा संघर्षाचा केंद्रबिंदू राहिला आहे आणि म्हणूनच कलम ३७० कलम रद्द केल्याने होऊ शकणारा संघर्ष काश्मीरकेंद्रित असला तरी त्याचे परिणाम काश्मीर खोऱ्याच्या बाहेरही जाणवणार आहेत.

# दत्तजयंती

**संगीता कुलकर्णी (मो. : ९८७०४५१०२०)**

महाराष्ट्राची संत परंपरा, संत वाङ्मय यातून नेहमीच भगवंताच्या विविध रुपाचे दर्शन घडत आले आहे.दत्तजयंती ही हिंदू पंचांगातली मार्गशीर्ष पौर्णिमा या तिथीला दरवर्षी साजरी केली जाते. मार्गशीर्ष पौर्णिमेच्या दिवशी मृग नक्षत्रावर सायंकाळी दत्ताचा जन्म झाला.म्हणून त्या दिवशी दत्ताचा जन्मोत्सव सर्व दत्तक्षेत्रांत साजरा होत असतो. दत्तात्रेय किंवा दत्त हे अत्री ऋषी व माता अनसूया यांचे पुत्र... चतुर्वेददर्शक चार श्वान व जवळ कामधेनू (गोमाता) असलेले श्री दत्तगुरू हे ब्रह्मा, विष्णु, महेश यांचे एकस्वरूप अवतार आहे..

दत्तगुरू हे अनेकांचे श्रद्धास्थान. त्यामुळेच दत्त जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. दत्तात्रय हा शब्द 'दत्त' व 'अत्रेय' अश्या दोन शब्दांनी बनला आहे..

वाडीस मनोहर पादुका, औदुंबर येथे विमल पादुका तर गाणगापूरच्या निर्गुण पादुका..

दत्तात्रय हे पाचव्या शतकापासून पुराण वाङ्मयात प्रसिद्ध झाले आहेत. मार्कंडेय पुराणात सतराव्या-अठराव्या अध्यायात दत्तात्रेयांचा उल्लेख आहे. दत्ताचा उल्लेख त्याचे साधक, परंपरेने गुरुदेव असा करतात. श्रीगुरुदेव दत्त हे हिंदू धर्मातील पहिले गुरू मानले जातात. हिंदू धर्माचा प्रसार करण्यासाठी त्यांनी भारत भ्रमण केले. ठिकठिकाणी त्यांची स्थाने (गादी) निर्माण करून आपली परंपरा चालू ठेवली. दत्तगुरूंनी पृथ्वीला गुरु केले आणि पृथ्वीप्रमाणे सहनशील आणि सहिष्णु असावे अशी शिकवण घेतली. तसेच अग्नीला गुरु करून हा देह क्षणभंगूर आहे अशी शिकवण अग्नीच्या ज्वालेपासून घेतली. अशाप्रकारे चराचरांतील प्रत्येक वस्तूमध्ये ईश्वराचे अस्तित्व पाहण्यासाठी म्हणून दत्तगुरूंनी चोवीस गुरु केले. हे सर्वांनाच ज्ञात आहे..

दत्ताचे प्रमुख अवतार - श्रीपाद श्रीवल्लभ, श्री नृसिंह सरस्वती, श्री माणिकप्रभु, श्री स्वामी समर्थ, श्री साईबाबा, श्री भालचंद्र महाराज. श्रीपाद श्रीवल्लभ हा दत्तांचा पहिला अवतार.. यांनी महाराष्ट्रात दत्तोपासना सुरू केली. श्री नृसिंह सरस्वती हा दत्ताचा दुसरा अवतार.. श्री गुरुचरित्रात श्रीपाद श्रीवल्लभ आणि श्री नृसिंह सरस्वती यांची विस्तृत माहिती दिलीली आहे. तरश्री. टेंबेस्वामींनी त्यांच्या 'दत्तात्रेय षोडशावतार' या ग्रंथात दत्तात्रेयांनी सोळा अवतार घेतल्याचा तपशीलवार व जन्मतिथीसह वृत्तांत दिलेला आहे. हे अवतार अत्री ऋषी व अनसूया यांचेसाठी (पुत्र म्हणून) व इतर भक्तांसाठी व सर्वांचे कल्याण करून त्यांना उपदेश देण्यासाठी घेतले

होते. हे अवतार याप्रमाणे : योगीराज, अत्रीवरद, स्वयं दत्त, कालाग्नीशमन, योगीजनवल्लभ, लीलाविश्वंभर, सिद्धराज, ज्ञानसागर, विश्वंभरावधूत, मायामुक्तावधूत, याच नावाचा (मायामुक्तावधूत) आणखी एक अवतार, आदिगुरू, शिवरूप, देवदेवावतार, दिगंबर, शामकमल लोचन हे अवतार होत...

दत्ताच्या मूर्तीएवढेच दत्ताच्या पादुकांनाही मोठे महत्त्व आहे. अनेक मंदिरांमध्ये फक्त दत्त-पादुकांची पूजा केली जाते. गिरनार पर्वत, पीठापूर, कुरवपूर, गाणगापूर, अक्कलकोट, नरसोबाची वाडी, औदुंबर ही स्थाने म्हणजे तीर्थक्षेत्रे आहेत..

एकमुखी दत्तमंदिर श्री क्षेत्र नारायणपूर - एकमुखी दत्त मूर्ती नारायणपूर पुण्यापासून ३०-३५ किमी अंतरावर असलेले हे सर्वांग सुंदर दत्तमंदिर.

योगसाधनेत दत्तात्रेयाला 'गुरू' मानले गेले आहे.. सर्वांचे 'गुरू' म्हणून मान्यता पावलेल्या दत्तात्रेयांनी स्वतः चोवीस गुरु केले. त्यांचा हा गुणग्राहकतेचा आदर्श आपणही आपल्या सर्वांगीण विकासासाठी अंगीकारणे योग्य ठरेल असे मी इथे मनापासून नमूद करीन..

दत्तात्रेयांसारखा विशाल दृष्टीकोन ठेवला तर आपला व्यक्तिमत्त्व विकास होण्यास नक्कीच मदत होईल. समाज अधिक निरोगी निकोप होईल ह्यात शंका नाही...

## बामणाचा पत्रा

**किशोर आनंदराव देशमुख (मो. : ९९२१३३५२५३)**

आधुनिक वाल्मिकी - गदिमा - अर्थात - गजानन दिगंबर कुलकर्णी (माडगुळकर)मराठी साहित्य विश्वात ज्यांच ध्रुव ताऱ्यासारख अढळ स्थान आहे ते म्हणजे कवि - लेखक गदिमा - ग दि माडगुळकर. त्यांच गाव - माडगुळ - ता - आटपाडी जि. सांगली. परवा मी चोपडी ता सांगोला इथे एका लग्नकार्याला गेलो होतो. येथून अवघ्या ५ किमी अंतरावर गदिमांच गाव माडगूळ आहे अस समजल. लग्न आटोपून माडगुळकडे निघालो. जाताना एक वेगळीच ओढ मनात होती. एखाद्या मंदिराकडे जाताना जी अनावर ओढ मनात असते अगदी मन तस पुढ धावत होत आणि त्या मागे गाडी पळत होती.... गावाजवळ आलो... एक मावशी रस्त्यावर उभ्या होत्या. त्यांना विचारल, माडगुळकरांच घर कुठे आहे? तेथुन अवघ्या १०० फुटावर ते घर होत.... गाडीतुन उतरलो... गेटला - वाड्याला कुलुप... तिथे जवळच वाडा आणि शेतीची देखभाल करणाऱ्या रामोशी समाजाच घर होत. तिथ जाऊन त्याला वाडा दाखवण्या बद्दल बोललो. तो लगेच चावी घेऊन आला आणि सर्व माहिती सांगु लागला. अतिशय सुंदर मराठीत.... म्हणतात ना पुष्पसंगे मातीस वास लागे....! गेल्या ४ पिढ्या हे रामोश्याच घर शेती आणि वाड्याची देखभाल करत होत. गेट उघडल....समोरच. आण्णांचा डिजीटल त्यावर लिहील होत.... दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा.... पराधीन आहे ... जगती पुत्र मानवाचा...! अवघे ५७ वर्ष आयुष्य मिळालेल्या आण्णांनी प्रत्येक मराठी सारस्वताला आयुष्यभर पुरेल एवढी साहित्यिक शिदोरी पाठीमागे ठेवली आहे. वाडयाचा मुख्य दरवाजा उघडाच होता. जाताना मुख्य दरवाजाच्या उंबरठ्याच दर्शन घेतल. वाडयात मध्यभागी औदुंबराच झाड होत.... जणुकांही त्या देववृक्षाने आण्णांसारख्या देवमाणसाचं अस्तित्व त्यांच्यारुपाने दाखवल होत. त्यानंतर आतल्या दोन खोल्यात गेलो. माळवदाच घर होत. आतमध्ये श्री गणेशाच चित्र आणि बाजुला आण्णां चा फोटो.... शेजारीच देवघराची खोली..... ज्या ठिकाणी सरस्वतीने प्रत्यक्ष सुवास केला त्या ठिकाणी उभारल्यावर अंगावर रोमांच उभे राहीले.

माझ्या लहानपणी वडिलांनीरेडीओसमोर बसवुन संपुर्ण गीत-रामायण ऐकायला लावलेल.... रेडीओसमोर उदबत्ती लावुन माझेवडील तल्लीन होऊन गीतरामायण ऐकायचे. त्यातील एखाद्या शब्दाला अशी काय दाद द्यायचे. मला समजायच नाही... पण नक्कीच कांहीतरी भारी असाव हे जाणवायच... तो भाग संपल्यावर गीत रामायणाच्या त्या पुस्तकातील गाण वाचुन त्याचा अर्थ सांगायचे. तेव्हा वाटायच कसे शब्द सुचत असतील. सीता स्वयंवरा वेळी... झुकले थोडे राम - जानकी घाली वरमाला किंवा त्या नंतर फुलु लागले फुल हळु हळु गाली लज्जेचे.... स्वयंवर झाले सीतेचे...! किंवा त्या नंतर हनुमंताच्या तोंडी, प्रभो मज एकच वर द्यावा... स्वयें श्री रामप्रभु ऐकती... कुश लव रामायण गाती...! ही गीत रामायणातील गाणी गाताना सुधीर फडके यांचा स्वर त्यातील भाव - भावना अगदी हृदयाला आतवर भिडतात.... अशा या थोर साहित्यिकाच्या घरी जायला मिळाल... कुंभमेळयाला गेल्याच पुण्य मिळाल..... आणि तेथुन मग गदिमा नी ज्या शेतात बसुन अधिकाधिक साहित्य निमिर्ती केली त्या त्यांच्या शेताकडे म्हणजेबामणाचा पत्रा.

माडगुळ गावातील अण्णांचा वाडा पाहिला मन भरून आल होत. इथला प्रत्येक चिरा आणि मातीच्या कणाने आण्णांच्या सहवासाचा आनंद उपभोगला असेल. वाड्याची भव्य चिरेबंदी चौकट आणि आतल्या लाकडी माळवदाने कित्येक वेळा येता जाता अण्णांना पाहिल असेल... वाटल जर हा वाडा बोलु लागला तर नेमक्या काय आठवणी सांगेल - गदिमा बद्दल.... वाडा आणि शेत सांभाळणाऱ्या रामोशाच्या मुलाने सांगितल की आण्णा शेतात जास्त रमत आणि तिथच त्यांच साहित्य लेखन जास्त झाल. त्या वास्तुला बामणाचा पत्रा अस म्हणतात आणि ते शेत गावाला चिटकुन हाकेच्या अंतरावरच आहे. त्या मुलाने वडीलांना फोनवर सांगितल, वैराग - बार्शी चे देशमुख यायलेत तिकड आणि आम्ही निघालो - बामणाच्या पत्र्याकडे.... जवळपास ५० एकराच शेत - रस्त्याच्या दोन्ही बाजुला हरबरा, ज्वारी, गहु आदि पिकं वाऱ्याच्या झुळकी सरशी जोमाने डुलत होती. गाडीतुन ती वास्तु दिसली, रोडच्या कडेला लोखंडी गेट आणि कौलारू घर - घरावर कौलं होती. समोरची भिंत तांबड्या कावेनं रंगवलेली मध्ये पांढर्या रेषा काढलेल्या. मस्त टुमदार खोली होती.खोलीत प्रवेश करतानाच समोर अण्णांच तैलचित्र... त्याला सकाळीच घातलेला ताज्या फुलांचा हार.... फोटोसमोर उभं राहुन दर्शन घेतल. तिथ टेबलवर भेट द्यायला येणाऱ्या व्यक्तींच नाव गाव मोबाईल नंबर लिहिण्यासाठी मोठी वही (क्वायर) ठेवलेल. वरच्याच पानावर सुबक अक्षरात बामणाचा पत्रा अस लिहीलेल. मी त्यात नाव गाव - मो. नं. लिहीला.

त्या मुलाचे वडील सांगायले.... गदिमा याच खोलीत लिहीत बसायचे. ही खोलीतली फरशी त्याच वेळची - मागच्या खोलीवरील पत्रा बदललेला आणि भिंतीना प्लॅस्टर केल आहे.... अर्थात वास्तु टिकण्यासाठी अशी थोडीफार डागडुजी करणं गरजेच असत. संपुर्ण वास्तु फिरून पाहिली... पुन्हा वाड्यात जस मन भरून आल होत तोच प्रकार घडला... अशी माणस का लवकर जातात... छत्रपती शिवाजी महाराज ५२ व्या वर्षी गेले. छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यासाठी ३२ व्या वर्षी हौतात्म्य पत्करल.... आणि गदिमा ५७ व्या वर्षी गेले. त्यांनी लिहिलेली गाणी मनात रुंजी घालत होती. अर्थात नव्या पिढीला ही गाणी माहिती आहेत की नाही हा गंभीर प्रश्न... त्या गीतामधले शब्द - त्याचा अर्थ - त्या गाण्याची चाल... गदिमांच्या गाण्याचे संपुर्ण मराठी भाविकांवर गारुड होते ते आज ही जसेच्या तसे टिकुन आहे.

एक गाण आहे.... प्रत्येक शब्दात शेवटी ळ हे अक्षर येते

१) घननीळा लडीवाळा, झुलवु नको हिंदोळा

२) एका तळ्यात होती बदके पिले सुरेख...

३) दैव जाणिले कुणी...

४) मज नकोत अश्रु घाम हवा
५) चंदाराणी का ग दिसतेस थकल्यावाणी हे बालगीत..
६) हे राष्ट्र देवतांचे, हे राष्ट्र प्रेषितांचे , आचंद्र सुर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे
७) कानडा राजा पंढरीचा.. हे भक्तीगीत
आणि या गाजलेल्या लावण्या
८) बुगडी माझी सांडली ग.. जाता साताऱ्याला
९) तुझ्या ऊसाला लागल कोल्हा
१०) बाई मी पतंग उडवीत होते
११) कुणी तरी बोलवा दाजीबाला

गदिमां नी १५७ सिनेमाच्या पटकथा लिहील्या. तर २००० पेक्षा जास्त मराठी गाणी लिहीली. मराठी चित्रपटात कथाकार, पटकथाकार, संवादलेखक, गीतकार, अभिनेता, निर्माता या सर्वच क्षेत्रात काम केल. जणु कां ही चौरंगी चिराच होते ते. कांही साहित्य माडगुळ या गावी बामणाच्या पत्र्यात तर कांही साहित्य पुणे येथील त्यांच्या पंचवटी या घरी लिहील गेल.

शेवटी निरोपाचा क्षण आला. येताना जे राखण करतात त्या रामोशी पितापुत्रासोबत फोटो काढला. त्यांनी सांगितल सर्व नातलग हुरडा खायला पुढच्या महिन्यात येतील. तुम्हाला फोन करतो या हुरडाखायला - गप्पा मारायला - दोन दिवसाच्या मुक्कामासाठी..... अजुनही खेड्यात आपुलकी प्रेम टिकुन आहे हे जाणवलं. आण्णांचा प्रतिमेला अभिवादन केल आणि माडगुळ ला पाठीमागे टाकत गाडी आटपाडी च्या दिशेने धावु लागली... शरीर गाडीत तर मन अजुनहीबामणाच्या पत्र्यात च रेंगाळत होत. अशा या महाराष्ट्राच्या सुपुत्रास विनम्र अभिवादन...!

## मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक, दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

**पत्रकार दत्ता आराध्ये, सोलापूर**

मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक म्हणून आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे नाव घेतले जाते. त्यांचा जन्म ६ जानेवारी १८१२ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोंगुर्ले या गावी झाला. जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण या नावाचे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू केले. त्यामुळे हा दिवस मराठी वृत्तपत्रसृष्टीत पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो.

बाळशास्त्री जांभेकर ही आधुनिक भारतातील अलौकिक व्यक्ती होती. त्यांनी पत्रकारीतेसह शिक्षण, समाज सेवा, वेदाभ्यास, इतिहास, गणित निबंध अशा विविध स्वरूपात कार्य केले आहे.

६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्रींनी दर्पण हे नावाचे मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. बाळशास्त्री जन्मताच विद्वान होते वयाच्या १७ व्या वर्षी मराठी, इंग्रजी, संस्कृत, गुजराती, बंगाली, पारसी अशा भाषांवर त्यांनी प्रभुत्व मिळविले होते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभुर्ली हे जन्मगाव. गंगाधर शास्त्री जांभेकर यांचे बाळशास्त्रीय चौथे अपत्य होते. सदाशिव काशिनाथ छत्रे यांनी कोकणातून अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मुंबईत आणले. अनेक मुलांचे आयुष्य नावारूपाला आणले त्यातच बाळशास्त्री जांभेकर देखील होते.



गणितासारख्या विषयात बाळशास्त्री इतके पारंगत झाले की १८२९ पासून गणिताचे अध्यापक म्हणून काम करण्याची त्यांना संधी मिळाली. नोव्हेंबर १८३४ मध्ये पहिले असिस्टंट प्रोफेसर म्हणून बाळशास्त्रींची एल्फिन्स्टन कॉलेजात नेमणूक झाली. याच काळात तिसऱ्या दक्षिण विभागातील शाळांचे तपासणीस म्हणून बाळशास्त्रींवर जबाबदारी आली. दक्षिण विभागातील मराठी शाळांच्या तपासणीचे काम बाळशास्त्रींनी तब्बल चार वर्षे मोठ्या उत्साहाने आणि देशसेवेची भावना बाळगून केले. विद्यार्थ्यांना चारित्र्यसंपन्न करणे, त्यांचे जीवनमान सुधारणे, नीतिमत्ता सुधारणे, सारासार बुद्धी विकसित करणे यादेखील शिक्षकांच्या जबाबदाऱ्या आहेत असे त्यांचे मत होते. त्यासाठी त्यांनी शिक्षकांच्या प्रशिक्षणाची योजना आखली.

बाळशास्त्रींनी शिक्षणाच्या अनुषंगाने खूप लेखन केले विविध विषयावरची पाठ्यपुस्तके तयार करण्याचा मान त्यांच्याकडे जातो. बाळशास्त्री जांभेकर यांनी पाठ्यपुस्तकांच्या संदर्भात मोठे कार्य केले होते त्यांनी १८३६ मध्ये भूगोल विद्या नावाने पहिले मराठी पाठ्यपुस्तक लिहून प्रकाशित केले. त्यामुळे आद्य भूगोल पाठ्यपुस्तक लेखक या विषयाचेही ते मानकरी ठरतात.

तत्कालीन ब्रिटिश सरकारने मुंबई, पुणे येथे शिक्षणासाठी पुढाकार घेतला होता अनेक तरुण मान्यता प्रतिष्ठान आणि नोकरी यासाठी इंग्रजी शिक्षणाकडे वळत होते. सरकारमध्ये काय चाललं आहे हे लोकांना समजावे यासाठी त्यांनी रघुनाथ हरिश्चंद्र आणि जनार्दन वासुदेव यांच्या सहकार्याने 'मुंबई दर्पण' नावाचे वृत्तपत्र ६ जानेवारी १८३२ रोजी काढले. मराठीतले ते पहिले पाक्षिक वृत्तपत्र ठरले. एका बाजूस इंग्रजी मजकूर आणि दुसऱ्या बाजूस मराठी मजकूर त्यात असे. एक बाजू इंग्रजीत असल्याने एका अर्थाने इंग्रजी वृत्तपत्र काढणारेही ते पहिले भारतीय ठरले. दर्पण नंतर त्यांनी दिग्दर्शन नावाचे मराठीतले पहिले मासिक १ मे १८४० सुरू केले. या मासिकातील लेख लोकशिक्षणासाठीच होते. अशा या विद्वान व्यक्तीला अवघे ३४ वर्षे आयुष्य लाभले. १८ मे १८४६ ला त्यांचा मृत्यू झाला. तरीही त्यांनी मराठी वृत्तपत्र सृष्टीचा पाया घातला. त्यांनी विविध क्षेत्रात केलेले कार्य कायम स्मरणात राहील. त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.



## भावपूर्ण श्रद्धांजली

संस्थेचे सभासद श्री. अरविंद नांदापूरकर यांच्या मातोश्री कै. मालती नांदापूरकर यांचे दुःखद निधन झाले. संस्थेचे पदाधिकारी, सर्व सदस्य यांच्यातर्फे कै. मालती नांदापूरकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**आपल्या अनुभवांचे संचित पुढच्या पिढीला मार्गदर्शक असते. ते शब्दसुमनांत गुंफा आणि पुस्तकरूपाने प्रसिद्ध होऊ द्या. आम्ही या वाटचालीत हस्तलिखित ते पुस्तक रूप देण्यास सज्ज आहोत.**

**संपर्क : अतुल जोशी, मो. : ९८२०१७८३४२, ७०२१४४०७१५**

# SHRI YASH TOURS

Central Railwaymen Society,
Plot No.41, Kalyan Road,
Dombivli (E) 421 201
Maharashtra State

आयोजक - श्रीकांत पाटसकर CELL : 9819148002

SPECIALIZED : PACKAGED TOURS ALL OVER INDIA INSTANT HOTEL BOOKING TOURS ALL OVER INDIA & SOUTH EAST ASIA, AIR TICKETS

E-Mail : shriyashtours04@gmail.com

## कौटुंबिक वातावरणात दर्जेदार सहली

| | |
|---|---|
| मदुराई, कोडाई केनॉल, तंजावर, रामेश्वर | जाने. १६ ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. २३,००० + विमान |
| कलकत्ता, शांती निकेतन व सुंदरबन | जाने. २५ ५ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. २५,००० + विमान |
| राजस्थान, (मारवाड) , जयपुर,जोधपूर, जैसलमेर, बिकानेर | फेब्रु. ९ ६ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू. ३१,५०० + विमान |
| इंदौर, उज्जैन, ओंकारेश्वर, मांडू | फेब्रु. १६ ४ रात्र<br>खर्च प्र.रू. १९,००० + रेल्वे |
| स्टॅच्यू ऑफ युनिटी, बडोदा, गरूडेश्वर व पोयचा ( स्वामी नारायण मंदिर) | फेब्रु. २३ ३ रात्र<br>खर्च प्रत्येकी रू.१३,००० + रेल्वे |
| म्हैसुर, उटी | मार्च १९ ५ रात्र<br>खर्च प्र. रू.२५,००० + विमान |
| काश्मीर - श्रीनगर, पहलगाग, सोनमार्ग, - गुलमर्ग व कारगील | मार्च २६ ७ रात्र<br>एप्रिल २, ९, १७,<br>खर्च प्र. रू. ३३,०००+ विमान |
| दार्जिलींग, गंगटोक, पेलिंग | एप्रिल २७ ६ रात्र<br>खर्च प्र. रू. ३३,००० + विमान |

सुचना - ए.सी. हॉटेल वास्तव्य (Twins Sharing) , ए.सी. बस प्रवास
- सकाळी नाश्ता व रात्रीचे भोजन, स्थळदर्शन व स्थळ मार्गदर्शक, प्रवेश शुल्क इ. सहल खर्चात समाविष्ट.
- जी.एस.टी. टॅक्स स्वतंत्र द्यावा लागेल.

## श्री समर्थांच्या जीवनांतील ठळक घटना



१६०८ – रामनवमीचे दिवशी औरंगाबाद जिल्ह्यांत जांब गांवी समर्थांचा जन्म
१६१३ – जांब येथेच घरी नारायणाची उर्फ समर्थांची मुंज.
१६१६ – बालपणीच समर्थांना दर्शन व अनुग्रह दिला.
१६२० – विवाहमंडपांतून बारा वर्षाचे नारायणाने पलायन केले.
१६२० – नाशिक शहरातील टाकळी येथील निर्जन परिसरांत तपश्चर्या सुरु.
१६२३ – दशपंचक गावचे श्री. कुलकर्णी यांचे प्रेत स्व – सामर्थ्याने उठविले.
१६३० – छत्रपति शिवाजी महाराजांचा शिवनेरी किल्ल्यावर जन्म.
१६३१ – समर्थ रामदास व शहाजी राजे यांचे टाकळी येथे भेट.
१६३२ – तपश्चर्या पूर्ण करून भारत प्रवासाला प्रारंभ.
१६४४ – बारा वर्षात हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत पायी भारत प्रवास पूर्ण.
१६४५ – महाबळेश्वरला आले. राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक कार्यास प्रारंभ.
१६४५ – मसूर येथे मारुतीची स्थापना व रामनवमी उत्सव सुरु.
१६४८ – अंगापूरचे डोहांत सापडलेल्या राम मूर्तीची चाफळ येथे स्थापना.
१६४९ – समर्थ रामदास आणि तुकाराम महाराज यांची चिंचवड येथे भेट.
१६४९ – शिवाजी राजे व रामदास स्वामी यांची चाफळजवळ सिंगणवाडीला पहिली भेट व अनुग्रह.
१६५५ – व्यंकोजीराजे भोसले यांनी समर्थांकडून अनुग्रह घेतला.
१६५५ – समर्थांच्या मातोश्रींचे निर्वाण (जांब येथे).
१६५६ – शिवथरघळीजवळच चंद्रराव मोरेला शिवाजींने ठार मारले.
१६५६ – शिवाजी महाराजांनी समर्थांचे झोळीत राज्य टाकले.
१६५९ – पंढरपूरला पांडुरंगाने रामरुपाने समर्थांना दर्शन दिले.
१६६३ – जेजुरी येथे खंडोबाने रामरुपाने दर्शन दिले.
१६७३ – शिवाजी महाराजांनी परळीचा किल्ला आदिलशहाकडून जिंकून घेतला.
१६७४ – शिवाजी महाराजांचा रायगडावर राज्याभिषेक.
१६७६ – शिवाजी महाराजांच्या विनंतीवरून समर्थ सज्जनगडावर कायमचे रहावयास आले.
१६७९ – संत वेणास्वामींनीं कीर्तन करता करता समर्थ चरणावर देह ठेवला.
१६८० – रायगडावर छत्रपति शिवाजी महाराजांचे महानिर्वाण.
१६८१ – संभाजी राजेंना समर्थांनी सज्जन गडावरून ऐतिहासिक पत्र लिहिले.
१६८२ – तंजावरहून राम, लक्ष्मण, सीता, हनुमान या मूर्तींचे आगमन.
१६८२ – पूर्वसूचना देऊन सज्जनगडावरच समर्थांनी देह ठेवला.
१६८२ – संभाजी महाराजांनी समर्थांचे समाधिमंदिर बांधले.
१७१४ – कल्याणस्वामींचे परांडा येथे महानिर्वाण.
१६५४ – शिवथरघळींत दासबोध ग्रंथलेखनास प्रारंभ.
१७२१ – अक्कास्वामींनीं सज्जन गडावर देह ठेवला.

*With*
*Best*
*Compliments*
*From*



S E

# SANGRAM ENTERPRISES

**PHARMACEUTICAL DISTRIBUTORS**

**VILAS JOSHI I SANGRAM JOSHI I SOUMITRA JOSHI**

**: Office :**
Apollo, A-3, Basement,
Bajiprabhu Deshpande Marg,
Vishnu Nagar, Naupada,
Thane (West) 400602
Tel. : 25408561 / 25408565

Best Wishes From

Reg. No. AR9/RSR/UOG/23952/96-97

# SAMARTH

## URBAN CO-OP. CREDIT SOCIETY LTD., BELGAVI.

**RC NAGAR BRANCH:**
"Bhagirathi" R.S.No. 731/D-2,
C Scheme, Channamma Nagar
Main Road, Belagavi -06
Phone: 0831-2443161

**TILAKWADI BRANCH:**
CTS. No. 87/B,
Mangalwar Peth, Tilakwadi,
Belagavi -06
Phone : 0831-2430357

**SHAHAPUR BRANCH:**
CTS 1103, Ground Floor,
Bichu Galli, Shahapur
Belagavi-03
Phone: 0831-2431257

**KHANAPUR BRANCH:**
1524/A6, Mannerikar Building
Beside State Bank,
Belagavi Goa Road, Khanapur
Mob: 6363090655

**Unique Deposit Scheme With Attractive Rate of Interest**

**Kalpataru Deposit Double in 84 Months**

**HEAD OFFICE:**
"Samarth Sadan", Gurukrupa Complex, 1st Floor, 1513, Maruti Galli, BELAGAVI-01
Phone: 0831-2431357, 2403968, 4202100



**Ajay A. Sunalkar**
Chairman

| AKSHAY DEPOSIT* | |
|---|---|
| 46 Day to 180 Days | 6.00% p.a. |
| 181 Days to 364 Days | 6.50% p.a. |
| 1 Year | 8.00% p.a. |
| 2 Years | 9.00% p.a. |
| 3 Years | 10.00% p.a. |
| Senior Citizen Extra 1% (1,2,3 Years) | |



**Abhay V. Joshi**
Vice Chairman

**BOARD OF DIRECTORS**

Vinayak G. Joshi
Pradeepkumar G. Kulkarni
Mrs. Chaya N. Joshi
Arvind S. Kulkarni
Ganapat A. Kulkarni
Raghavendra S. Kesnur (Secretary)
Mrs. Sunanda C. Altekar
Anil V. Bhandari
Umesh D. Sunagar
Parashuram M. Kamble
Ashok H. Pujeri
Mrs. Gouri Bidi (General Manager)

*Terms & Conditions Apply

**R.N.I. 16775/68 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

**पंचम निषादचे श्री. शशी व्यास यांचा मध्यवर्ती मंडळातर्फे सत्कार**
**सोबत – सौ. व्यास, श्री. मेकल, श्री. उदय तारदाळकर, संस्थेचे अध्यक्ष श्री. विलास जोशी,**
**कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर कुलकर्णी**




Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH